

# उद्याच्या चाळीत उडती तबकडी

जयंत नारळीकर





“हे साले काय लाइफ झाले?” भेळेचा समाचार घेत सोकाजी त्रिलोकेकर म्हणाले.

“लाइफ? कोणाचे लाइफ?” बाबूकाका खरे, इतिहास संशोधक, दचकून उद्गारले.

लाइफ म्हटले की त्यांच्या डोक्यात एकच अर्थ उमटे... जीवन चरित्र. त्यांना चंद्रगुप्त मौर्यापासून दुसऱ्या बाजीरावापर्यंत सत्तावीस चरित्रे तिथी-सालासकट पाठ होती. पण सोकाजीची उडी तिथपर्यंत जावी याचे त्यांना सकौतुक आश्चर्य वाटले. त्यातून चौपाटीवर भेळ खाताना अशा गंभीर, विद्वत्ताप्रचुर विषयांचा उहापोह होत नसे.

“साला इडियट्! अरे काका, आपले लाइफ. चाळीत राहणारे आपण... सकाळी ट्रॅमने कामाला जाणार. साहेबाला नाहीतर त्या खडूस हेडक्लार्कला फ्लॅटर करणार, मग डब्यातून आपल्या बायलोकांनी पाठवलेली रस्सापोळी खाणार, थोडी स्लीप घेणार अन् ते सालं लेजर भरणार... अन् वेळ झाली की तीच ट्रॅम घेऊन घरी परत, सारे काही सेम सेम... आज, उद्या सेम, परवा सेम, रुटीन...”

“हा: हा: हा:... ही: ही: ही:... पफ्” तोंडातून हास्याचे अन् चिरमुऱ्यांचे फवारे सोडत काशीनाथ नाडकर्णी म्हणाले.

“नाडकर्णी, तूही साला इडियटच! मी इकडे मोठी फिलॉसॉफी बोलतोय तर तुला वाटते मी जोक मारला,” सोकाजी चिडून उद्गारले.


“सॉरी सोकाजी! तू नाही केलास जोक... पण मला आठवला एक. एक बंगाली बाबू न्यू इयर्स पार्टीला गेला. त्याला कोणी तरी म्हटले, 'हॅपी न्यू इयर बाबू मोशाय' तर तो उत्तरला 'शेम टू यू'... हा: हा: हा:...”

“साला यात कसला आलाय जोक!” सोकाजींचा हा उद्गारवाचक प्रश्न ऐकून कोचरेकर मास्तर आपल्या धर्माला जागले. “त्रिलोकेकर, जेव्हा तुम्हाला कोणी शुभेच्छा देतो इंग्रजी भाषेत, तेव्हा प्रत्युत्तर म्हणून 'स' आणि 'श'मध्ये भेदभाव करत नाहीत, तेव्हा...'

मुलांच्यात विनोदबुद्धी जागृत व्हावी म्हणून कोचरेकर मास्तर मुलांना वर्गात चुटके सांगायचा 'गृहपाठ' देत. चुटका सांगून झाला की, त्याचे सखोल विश्लेषण करीत, आणि त्यातील विनोद नेमका कुठे हे प्रश्नोत्तरांनी विद्यार्थ्यांना शोधायला लावीत.

पण हे 'पोस्टमॉर्टम' मध्येच कटवीत सोकाजी म्हणाले, “होय रे कोचऱ्या. मी तो जोक अंडरस्टॅण्ड केला होता. पण त्याचा इथे रेलेवंस दिसला नाही. हा नाडकर्णी आपल्या डिस्कशन टॉपिकला उगीच फाटे फोडतोय!”

“आणि आपण अशा तऱ्हेने बंगाली, सरदारजी, दाक्षिणात्य, यूपीतले भय्ये यांच्यावर विनोद करत राहिलो तर आपले राष्ट्रीय ऐक्य टिकणार तरी कसे? केव्हा आपण इतिहासाकडून धडा शिकणार?” कळकळीने बाबूकाका खरे



म्हणाले. बाबूकाका आता, 'पेशवे-निजाम-टिपू' एकत्र आले असते तर भारताचा इतिहास कसा बदलला असता यावर आख्यान लावणार हे ओळखून काशीनाथ नाडकर्णी म्हणाले,

''सॉरी सोकाजी! तू आपल्या लाइफच्या चाकोरीबंदपणावर बोलत होतास ना? मग तोचतोचपणावर उपाय तरी काय? तुला पुन्हा भ्रमण मंडळ तर चालू करायचे नाही?''

''छे! छे! नको तो अनुभव पुन्हा.'' पानपतावरून परतलेल्या मराठ्यांपेक्षाही अधिक कळकळीने बाबूकाका उद्गारले. कोचरेकर मास्तरांना तर त्या पुणे-फियास्कोची आठवण येताच अंगात हुडहुडी भरे. (-पहा 'बटाट्याच्या चाळीची बखर' रुमाल क्र. १०, 'भ्रमण मंडळ', पु. ल. दे. - मौ. प्र. १९५८ : संपादक.)

''भ्रमण मंडळ आपण केव्हाच फर्गेट केला रे!'' सोकाजी म्हणाले, ''पण सांगा, माझे स्टेटमेंट फिटिंग आहे ना? आपल्या समद्या चाळीत गेल्या पाच वर्षांत आठवण ठेवावे असे काय इव्हेंट घडले रे?''

''शके अठराशे...''

बाबूकाकांचे वाक्य तोडत सोकाजी म्हणाले, ''तू हिस्टेरियतच्या नव्हे, तुमच्या आमच्या सिविलाइज्ड लँग्वेजमंदी बोल... नायतर गप्प बस.''

''पाच वर्षांपूर्वी गच्चीचा एपिसोड झाला...'' -नाडकर्णी.

''पंतांचे उपोषण झाले, त्याला, मला वाटते, चार वर्षे झाली,'' कोचरेकर खिशातून कसलीशी डायरी काढून ती चाळून म्हणाले. 'कुठल्याही विशेष घटनेची तपशीलवार नोंद ठेवावी' हा विद्यार्थ्यांना दिलेला संदेश मास्तर स्वत: आचरणात आणीत... कारण 'बोले तैसा चाले...' हाही त्यांच्या संदेशांपैकी होता.

''हेच ते! माझा पॉइंट असा की, असे एपिसोड फार कमी येतात. त्यामुळे लाइफमंदी एक्साइटमेंट मिळत नाय. आजचा टाइम्स बघा - बाहेर किती एक्साइटमेंट आहे... टर्कीत भूकंप तर पॅरिसमध्ये एका वेटरला दहा लाखाची लॉटरी... आणि नायरोबीत सिंह मोकाट सुटला... आपल्या चाळीत कॅटदिखिल फिरकत नाही.''

''सोकाजी, असली एक्साइटमेंट आपल्याला पचणार नाही... आपले जीवन सरळ रुळावरून चालले आहे तसेच चालू द्या...'' चाकोरीबद्ध, नियमबद्ध जीवन जगू पाहणारे कोचरेकर मास्तर म्हणाले. वर्षातून एकदा होणारे दिपोटीचे आगमन तेवढे त्यांना एक्साइटमेंट म्हणून पुरे होते.

पण काही तासांतच त्या चौकडीच्याच नव्हे तर अख्ख्या चाळीच्या जीवनाला ढवळून काढणारी एक घटना घडणार होती... नव्हे; तिची सुरुवात झालीच होती.

भेळेचा कार्यक्रम आटोपून ही चौकडी झावबाच्या वाडीत शिरली तेव्हाच त्या चौघांना जाणवले की, आज काहीतरी खास घडले आहे. कारण वाडीतील घराघरांवर 'चाळभैरव'च्या खास अंकाची भित्तिपत्रके चिकटवलेली दिसत होती. संपादक म्हाळसाकांत पोंबुर्पेकराने सढळ हस्ताने मोठ्या अक्षरांत खास बातमीची खिरापत वाटली होती. तसे म्हटले तर 'चाळभैरव'चे 'अ खास' अंक कधीच मिळाले नाहीत आणि प्रत्येक अंकातली बातमी 'खास'च असे. तरीपण आजची शीर्षके विशेष बोलकी होती...

'बटाट्याच्या चाळीत गच्चीवर उडती तबकडी...'

'चाळीतील कुमारद्वयाचा खळबळजनक शोध...'

'यानाचा सबळ पुरावा... साक्षात्काराची साद्यंत हकीकत'

'हे जीव मंगळावरून आले असावेत, म्हणून ज्यांना मंगळ आहे त्यांना या जीवांकडून कसालाही धोका संभवत नाही... चाळीतले ज्योतिषी ग्रहगौरव अण्णासाहेब पावशांची ग्वाही'

'मधू चौबळ आणि काशीनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा ह्या दोघांचा चाळीत उद्या जाहीर सत्कार.'

शीर्षके प्रचंड आणि बातमी थोडीच ही चाळभैरवची परंपरा पाळण्यात आली होती. सविस्तर वर्णन उद्याच्या खास अंकात वाचण्याचे आवाहनदेखील नेहमीप्रमाणे होते. काशीनाथ नाडकर्णी एक भित्तिपत्रक काढून वाचू लागले...

'परवा दुपारी दोन वाजून सतरा मिनिटांनी एक तबकडीवजा यान आकाशातून उडत आले आणि काही काळ बटाट्याच्या चाळीच्या गच्चीवर विसावले, अशी खळबळजनक बातमी चाळभैरवच्या वार्ताहराने पाठवली आहे. क. ध. संयोगाने मधू चौबळ त्यावेळी गच्चीच्या जिन्यात असल्याने (-तो त्यावेळी तेथे काय करीत होता हे सांगायला त्याने स्पष्ट नकार दिला, असे आमचा वार्ताहर सांगतो - पण कुशाभाऊ अक्षीकर यांनी योग्य वेळी खास चाळभैरवला ती माहिती पुरवायचे आश्वासन दिले आहे)

त्याने प्रसंगावधान वापरून काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाला पाचारण केले, कारण त्याला नुकताच एक बॉक्स कॅमेरा त्याच्या चुलत आजोबांनी वाढदिवसानिमित्त भेट म्हणून दिला होता. सुदैवाने कॅमेऱ्यात नवी फिल्म नुकतीच भरली होती. परंतु तो कॅमेरा घेऊन गच्चीवर येईपर्यंत यान परत आकाशात झेप घेत होते. मात्र ते दूर जात असताना त्याची छायाचित्रे दोघा कुमारांनी घेतली. आज ते प्रिंटस् मिळाले आणि त्यापैकी काही मुंबईच्या वृत्तपत्रांकडे पाठवण्यात आली आहेत. ही चित्रे असलेला चाळभैरवचा पुढील खास अंक आम्ही लवकरच प्रकाशित करणार आहोत.'

बातमीनंतर चाळीतील प्रौढ मंडळींच्या काही तात्काळ प्रतिक्रिया संमिश्र असल्याची नोंद होती. चाळभैरवने फक्त आचार्य बाबा बर्वे यांचीच प्रतिक्रिया सविस्तर, त्यांच्याच शब्दात दिली होती :

'भारताची आतिथ्यपरंपरा अनेक सहस्रकांची आहे. पूर्वी देव, दानव, गंधर्व, यक्षादि आले, त्यांचे भरतभूमीने स्वागतच केले. मग आर्यांनी आर्यावर्त व्यापला, त्यापाठोपाठ यवन, हूण, म्लेंच्छ, पारसिक येत गेले, काही इथेच वसले. इतर देशांनी नवागतांचा प्रतिकार केला, त्यांना हाकलून दिले; कारण त्या देशवासियांचे मानसिक दौर्बल्य. आम्ही त्याउलट परकीयांना समावून घेतलेच, पण त्यांना आमच्यावर राज्यही करू दिले; कारण आमचा मनाचा मोठेपणा–जो हिंसात्यागाने, नैष्ठिक ब्रह्मचर्याने मिळतो. 'इदं न मम' म्हणून आपली राष्ट्रीय संपत्ती पाहुण्यांना देण्याचे औदार्य आम्ही शतकानुशतके दाखवीत आलो, म्हणूनच हे परकीय जीव आपल्याकडे आले. मंगळावरून, गुरूवरून कुठूनही येवोत - शरणार्थींना येथे स्वागतच मिळेल. त्यांना निवारा हवा असेल तर देऊ. माझे काही चाळबंधू म्हणतील चाळीत जागेची टंचाई आहे. पण मनात जागा करून देणे महत्त्वाचे... मग भौतिक जागेचा प्रश्न सुटेल.'

(वास्तविक बाबा तासभर वक्तव्य देत होते. त्यातले बातमीदाराला काय समजले, उमगले, ते त्याने चाळभैरवमध्ये उद्धृत केले, असा खुलासा पोंबुर्पेकराने खासगीत केला. तो दोन तासात चाळविदित झाला. त्यावर बाबांनी मन:शांतीसाठी पोंबुर्पेकराशी सात दिवस तात्त्विक अबोला पाळला... : संपादक)

काशीनाथ नाडकर्ण्यांनी स्वत:च्या मुलाला हाका मारल्या. पण त्यांना समजले की तो आणि मधू चौबळ फोर्ट विभागातील वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांत गेले आहेत आणि त्यांना परत यायला उशीर होईल. (काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाचे नाव काय होते हा प्रश्न अनेक वर्षे अनुत्तरित होता. चाळ बखरीत कुठेही नामोल्लेख सापडत नाही. आणि मुळात एकच मुलगा होता की दोन यावरदेखील वाद आहेत. पण महाराष्ट्रातील एका विद्यापीठात सादर केलेल्या आणि पीएचडीसाठी स्वीकृत झालेल्या एका प्रबंधात हा यक्षप्रश्न यशस्वीरित्या सोडवण्यात आला आहे. शिवजन्मतिथीबरोबर याही ऐतिहासिक प्रश्नाची उकल एकाच वर्षी व्हावी हा योगायोग... संपादकीय टीप).

पण हे दोघे 'हीरो' नसले तरी अख्ख्या चाळीत उत्साहाचे वातावरण होते. चाळभैरव सोडा, पण उद्या टाइम्ससारख्या वृत्तपत्रात ही बातमी झळकणार... चाळीच्या गौरवशाली इतिहासाचे एक नवे पान उद्या सुवर्णाक्षराने - नव्हे त्याहून महत्त्वपूर्ण प्रिंटाक्षराने लिहिले जाणार होते.

■■■■

रोज सोकाजीकडे येणारा टाइम्स हे चाळीत येणारे एकमेव वृत्तपत्र. हे चाळीत सर्वश्रुत होते, आणि म्हणूनच रविवार सकाळ असूनही सर्वच लवकर उठाउठ होऊन त्रिलोकेकरांकडे चाळकऱ्यांची रीघ लागली. कारण प्रत्येकाला 'ती बातमी' ऐकायची होती. अखेर वैतागून सोकाजींनी पोंबुर्पेकरला उठवले... कारण तीच एक व्यक्ती निद्रासुख अनुभवीत होती.

''पोंबुर्प्या! साला तूच इथला पेपरवाला. हा आयटेम ट्रान्स्लेट करून राइट अप कर तुज्या मराठी पेपरमंदी... नायतर हे समदे माझा जीव खातील साले...''

स्वत:ला ही जबाबदारी देऊन चाळभैरवला टाइम्सच्या पंक्तीत बसवले असे वाटून पोंबुर्पेकर हरखून गेला.


Flying Saucer Seen on a Bombay Chawl ह्या शीर्षकाचा आणि त्यातील मजकुराचा चाळभैरव अनुवाद पहा.

**मुंबईतील चाळीवर उडती तबकडी**

काल दुपारी दोन हायस्कूलमधील मुलांनी दोन दिवसांपूर्वी गिरगावातील बटाट्याच्या चाळीवर एक उडती तबकडी पाहिल्याचा दावा केला. त्यापैकी मधू चौबळ याने त्या तबकडीचे काही फोटोपण घेतले. (मूळ फोटो टाइम्समध्ये पाहा - पोंबुर्पेकर). दुसरा मुलगा, ज्याचा तो कॅमेरा होता, यानाचे निरीक्षण करण्यात गुंतला होता. त्याचे वडील काशीनाथ नाडकर्णी हे फोर्टमध्ये एका कचेरीत कारकून आहेत.

ते यान चार-पाच मिनिटे विसावले, पण मुलांना आत काही हालचाल दिसली नाही. वेळ दुपारी सव्वादोनची होती आणि चाळभगिनी जेवणे आटोपून विश्रांती घेत होत्या. पण चाळीतल्या वरदाबाई हट्टंगडी यांनी सारंग राग आलापायला सुरूवात केल्यावर ते यान तेथून हलले आणि हळूहळू दूर निघून गेले, असे आमचे शाळकरी साक्षीदार म्हणतात. यान दूर जात असताना फोटो घेण्याची संधी त्यांना मिळाली.

यान बिलकूल आवाज न करता फिरत होते, असे मधूने

everest/2000/BCL/72 mr F

सांगितले. त्यामुळे इतर कोणाचे लक्ष तिकडे गेले नसावे. जुहू आणि सांताक्रुझ विमानतळावर चवकशी करता तेथील रेडारवर अशा कुठल्या उडणाऱ्या यानाची ओळख पटली नाही. मुंबईतील काही वैज्ञानिक संस्थांना त्याबद्दल विचारले असता तेथील शास्त्रज्ञांनी अशा ऐकीव घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त करायला नकार दिला. मात्र टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या अपोलो बंदरजवळच्या संस्थेचे संचालक डॉ. होमी भाभा यांच्या सांगण्यावरून तेथील शास्त्रज्ञ प्राध्यापक वाय. कोटीभास्करन् यांनी फोटोंची तपासणी करायची जबाबदारी स्वीकारली आहे.

दरम्यान जनसामान्यांत खळबळ निर्माण झाली असून अफवांना ऊत आला आहे. यान मंगळावरून आले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ह्या गोष्टीची शहानिशा होत असताना नवीन काही आढळले तर त्याचा पाठपुरावा टाइम्सचे वार्ताहर जोस डिसोजा करतीलच.

आणि काही तासांतच चाळीतले दैनंदिन जीवन आमूलाग्र बदलले! कधी नव्हे ते वृत्तपत्रांचे आणि रेडिओचे (- टी.व्ही.चा शिरकाव भारतात अजून झाला नव्हता... संपादक) तसेच नियतकालिकांचे देशी परदेशी वार्ताहर चाळीत येऊन मिळेल त्याची मुलाखत घेऊ लागले. त्यांतून हळूहळू असे स्पष्ट झाले की, यान स्पष्ट नाही तरी ओझरते पाहिलेले अनेक चाळकरी होते. काहींनी प्रथम नकारात्मक पवित्रा घेतला होता, पण वार्ताहरांनी खोदून खोदून विचारल्यावर 'काहीतरी' दिसल्याचे मान्य केले. काही निवडक प्रतिक्रिया (विविध वृत्तमाध्यमांतून प्रसिद्ध झालेल्या) खाली पहा:

राघूनाना सोमण : मी दुपारी पोष्टात डेड लेटर ऑफिसात पाठवायची पत्रे गोळा करीत होतो. सहज खिडकीतून डोकावून पाहता मला आकाशात काहीतरी उडताना दिसले. आकार तबकडीसारखा होता आणि ती वस्तू गिरगाव-ठाकुरद्वारच्या दिशेने जात होती. हेलिकॉप्टर किंवा विमानाचाच प्रकार म्हणून मी दुर्लक्ष केले. अशा परकीय तबकड्या मंगळावरून येत असल्या तर पृथ्वी-मंगळ टपाल सेवा चालू करावी, अशी माझी शिफारस आहे...

नाट्यभैरव कुशाभाऊ अक्षीकर : काल रात्री गंधर्वांचे 'मानापमान' नाटक पाहून जागरण झाले म्हणून झोपलो होतो. कसल्यातरी आवाजाने जाग आली. गच्चीकडे काही तरी हालचाल होती. (इथे कुशाभाऊंनी नाट्यमय भाषेत - नाही सांगवत हो मला - असे म्हणत मधू चौबळच्या 'चेष्टां'चे वर्णन केले. ते बातमीदाराने गाळले.) इतक्यात वरदाबाईंचे गायन सुरू झाले आणि मला तबकडीवजा यान उडत दूर जाताना दिसले. त्यातील खिडक्या-दारे स्पष्ट दिसत होती...

प्रा. कल्पलताताई फुलझेले : किनई, ... हे यान पाहून मला 'मंगलदूत' हे महाकाव्य लिहायची स्फूर्ती आली आहे. तसे यान ओझरतेच दिसले, पण मला तर बाई हा पृथ्वी आणि मंगळ यांना जोडणारा मित्रत्त्वाचा एक दुवाच वाटतो.

प्रा. नागूतात्या आढ्ये : आपले वैज्ञानिक महामूर्ख आहेत. टेक्सासमध्ये अशी तबकडी आल्याची वार्ता ऐकून न्यूयॉर्क, वॉशिंग्टनमधील शास्त्रज्ञ तातडीने तपासणी करायला गेले. पण आपले विद्वान मात्र शिष्टासारखे गप्प बसलेत.

(प्राध्यापक नागूतात्यांनी वेगवेगळ्या वार्ताहरांकडे वेगवेगळी विधाने केली. एकाला त्यांनी ठासून सांगितले की, उडत्या तबकड्यांच्या बातम्यांत काही अर्थ नसतो, तर दुसऱ्याला तितक्याच जोरात बजावले की, बटाट्याच्या चाळीवर दिसलेल्या तबकडीकडे दुर्लक्ष होता कामा नये.)

प्रा. काव्यकला कोरके : वरदाबाईंनी गायन जरा उशिरा सुरू केले असते तर?... तर कदाचित ते यान आणखी काही काळ थांबले नसते का? मला स्वत:ला मंगळ असल्याने हे यान माहेरचेच वाटले, आणि ते दूर जात असताना मला एका काव्यगीताचा साक्षात्कार झाला.

माझिया मंगळा जा रे पाखरा,
माझिया मंगळा जा।
तुला आहे सारथ्याला -
तोची अंतराळ वीर
वाट दाखवाया -
मिळे जायरो रेडार... ।।

(इथे बातमीदाराने घड्याळाकडे पाहून पोबारा केला म्हणून मराठी साहित्य एका आधुनिक अंतराळगीताला मुकले.)

कोचरेकर मास्तर : मी स्वत: यान पाहिले नाही पण ही घटना मला चिंतेची बाब वाटते. मंगळापासून आलेले यान असे तडकाफडकी परत का जावे? कारण त्याचा उद्देश टेहळणी करणे इतकाच होता. युद्धांत आधी टेहळणी, मग हल्ला हे ठरलेले असते. तेव्हा ते परकीय पुन्हा येतील आणि आपल्यावर ताबा मिळवतील, या भीतीने माझी झोप उडाली

आहे.

ग्रहगौरव अण्णा पावशे : मी चाळीची कुंडली मांडली, त्यात मंगळ आला तेव्हाच मी ओळखले होते की, असे काहीतरी होणार (–इथे अण्णांनी आपली भविष्य टिपणाची वही काढून दाखवली). आता चाळीला 'शांत' करणे फार आवश्यक आहे.

■■■■

पण ह्या वडील मंडळींपेक्षा दोघा 'हीरों'चा भाव वधारला, त्यांच्या मुलाखती सर्वत्र प्रसिद्ध झाल्या. त्यातल्या त्यात मधू चौवळाने केलेली वर्णने जास्त रसभरीत... नाही म्हणायला कुशाभाऊ अक्षीकरांना त्याच्या वेगवेगळ्या वक्तव्यांत विसंगती दिसल्या. परंतु एकंदर चाळीला मिळालेल्या प्रसिद्धीमुळे त्या विसंगतींकडे दुर्लक्ष करण्यात आले. ( 'हा कुशाभाऊ नेहमी मधूच्या वाईटावर टपलेला असतो. नाहीतरी पेपरवाले चुकीची वक्तव्ये छापीत नाहीत का? नेते मंडळींना विचारा! मी असे म्हटलेच नाही हे सांगण्यात त्यांचा निम्मा वेळ जातो'. इति भाईसाहेब चौवळ).

काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने मात्र संयम पाळला होता. तो पेपरवाल्यांना मुलाखती देत सुटला नाही. ('माणसाने प्रसिद्धीच्या मागे धावत जाऊ नये... मनाला लगाम घालावा.' – बाबा बर्वे) परंतु ह्या प्रसिद्धीपराङमुखतेचे कारण नंतर उघडकीला आले होते. सनसनाटी हकीगती छापणाऱ्या एका पीतपत्राने त्याच्या 'खास – अन्यत्र कुठेही प्रसिद्ध न झालेल्या' वृत्तांताबद्दल त्याला शंभर रुपयांची घवघवीत फी दिली होती.

परंतु त्या सर्व घटनेचा सर्वाधिक फायदा मिळाला मेंढे पाटलांना. 'तीच ती गच्ची' पहायला येणाऱ्या मुंबईकरांना आणि जिवाची मुंबई करायला आलेल्या बाहेरगावच्या लोकांना त्यांनी चक्क एक आण्याचे तिकीट लावले. तसेच दर्शनेच्छुंच्या सोयीसाठी म्युनिसिपालिटीच्या 'खर्चाने दोन 'सार्वजनिक नळ' बसवून घेतले. गच्चीवर जाणारा जिनादेखील सार्वजनिक खर्चातून जीर्णोद्धार होऊन मिरवू लागला. गच्चीवर मधूने, यानाची गोलाकार झाकणवजा पाऊले स्थिरावली त्या जागी, चॉकच्या फुल्या मारल्या होत्या. तिथला भाग यानाच्या उतरण्याने खरडला गेला असे मेंढे पाटील आवर्जून सांगत होते आणि 'रिपेरी'साठी मदतीचा अर्ज त्यांनी सरकारदरबारी केला होता. तो सरकारच्या 'सक्रिय विचाराधीन' होता. ( 'थापा माराताहेत मेंढे पाटील! गच्ची केव्हापासून खच्ची झालीय...' असे नागूतात्या सांगू लागले, तेव्हा त्यांना मेंढे पाटलांनी कसे गप्प केले हे चाळीला आजतागायत न उमगलेले कोडे आहे!)

त्यापाठोपाठ घटनेचा फायदा उठवणारा चापशी! गच्ची पाहायला येणाऱ्यांसाठी त्याने खाद्यपदार्थांचा स्टॉल उघडला. 'तबकडी भेळ' आणि 'मंगळ सोडा' हे आयटेम खास 'डिमांड'मध्ये होते.

लवकरच मुख्यमंत्र्यांनीदेखील गच्चीला भेट दिली. आणि अर्थातच बरोबर आलेल्या प्रेसवाल्यांना एक जाहीर वक्तव्यपण दिले. ''परग्रहावरचे यान प्रथम मुंबईत यावे हे योग्यच झाले. आणि ही नगरी अमुक राज्याची का तमुक राज्याची, अशा संकुचित विवादाला चोख उत्तर मिळाले. आम्ही मुंबईला 'कॉस्मॉपॉलिटन' म्हणत आलोय, ती आता 'कॉस्मिक सिटी' झाली. पंडितजींना हे वृत्त ऐकून निश्चितच समाधान वाटेल. म्हणून मी अभिमानाने जाहीर करतो की, शरणार्थींना निवारा देणाऱ्या ह्या नगरीत अशा यानातून येणाऱ्या परकियांना मानाची निवासस्थाने मिळतील...'' आणि परकीय प्रथम ह्या पृथ्वीवर उतरले त्या जागेचे – म्हणजे गच्चीचे – पुनरुज्जीवन करण्याचे आश्वासन त्यांनी जाता जाता मेंढे पाटलांना दिले.

■■■■

ह्या सर्व जल्लोषापासून अलिप्त असलेली एकमेव व्यक्ती, म्हणजे, प्राध्यापक कोटीभास्करन् हे गंभीर चेहऱ्याने पुराव्याची तपासणी करीत होते.

पुरावा सकृद्दर्शनी पटण्यासारखा होता. एकंदर बारा छायाचित्रे यान लांब जातानाची दिसत होती. त्यातल्या त्यात जवळच्या चित्रात यानातल्या खिडक्या उठून दिसत होत्या, तर लांबच्या चित्रात त्या अस्पष्ट होत्या आणि निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर यान अधांतरी दिसत होते. माणूस एकवेळ खोटी जबानी देईल, पण फोटो? फोटो तर आहे तेच दाखवणार नाही का? मायक्रोस्कोपमधून पाहूनसुद्धा त्यांत बनावट दिसत नव्हती. त्यातून कॅमेरा तर साधा बॉक्स कॅमेरा (–तोही प्रोफेसरसाहेबांनी कसोशीने तपासला होता –); अशा माध्यमातून ट्रिक फोटोग्राफी तरी कशी होणार? शिवाय चाळीतल्या मध्यमवर्गात वाढलेल्या मुलांकडून छक्केपंजे तरी किती होणार? तरी कोटीभास्करन् साहेबांचे समाधान होत नव्हते.

''चला थांबवा तुमची तपासणी! भयंकर शंकेखोर आहात तुम्ही – उगीच्या त्या बिचाऱ्या पोरांवर अविश्वास दाखवता. जरा वेळ ठेवा तुमच्या शंका बाजूला आणि जेवायला चला. भाजी–सांबार थंड व्हायला लागलेत.'' त्यांच्या सुविद्य पत्नी पार्वथीअम्मा उद्‌गारल्या.

ही मात्रा लागू पडली. कारण कोटीभास्करन् यांना गरमागरम जेवण लागे, तेही पहिल्या वाफेचे. ते ताबडतोब अभ्यासिकेतून उठून जेवणाच्या टेबलाशी आले. केळीच्या पानावर चटण्या, कोशिंबिरी वाढल्या होत्याच. पार्वथीअम्मा गरम पदार्थ वाढू लागल्या.

पण कोटीभास्करन् आपल्याच विचारात दंग! जेवणात लक्ष नाही हे पाहून सौभाग्यवती कडाडल्या ''अय्योऽय्यो! आज काय चालवलंय तुम्ही? आधी रसम्‌भात, मग सांबारभात,




everest/2000/BCL/72 mr G

मग दहीभात हा क्रम डावलून तुम्ही एकदम दहीभातावर कसे गेलात?... जेवणसुद्धा योग्य क्रमाने व्हायला नको का?''

''योग्य क्रमाने! लाखाचे बोललीस पार्वथी... माझा प्रश्न सुटलाच आता.'' असे म्हणत कोटीभास्करन् ताडकन् उठले आणि हाततोंड धुवून अभ्यासिकेकडे पळाले.

पार्वथीअम्मा अवाक् होऊन पाहात होत्या. त्यांनी मान डोलावली आणि स्वत:शीच हसल्या. त्यांच्या तीस वर्षांच्या वैवाहिक जीवनात पतिराजांच्या विक्षिप्ततेचा हा पहिलाच अनुभव नव्हता.

आणि पतिराज?

ते तामिळमध्ये आर्किमिडीज 'युरेका'ऐवजी काय म्हणाला असता, ते पुटपुटत तपासणीत दंग होते. मात्र चेहऱ्यावर चिंतेऐवजी स्मित होते.

■■■■

चाळीच्या गच्चीवर बाबा बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. वास्तविक सभेचे अध्यक्षपद आपल्याला मिळावे यासाठी प्रा. नागूतात्यांचे उघड आणि आडून प्रयत्न चालू होते. उडत्या तबकड्यांचा मुद्दा आध्यात्मात बसत नसून विज्ञानात बसतो आणि जसे आध्यात्म हे बाबांचे कार्यक्षेत्र तसे विज्ञान आपले, असा त्यांचा दावा होता. त्यातून उडत्या तबकड्यांचा अभ्यास जितका नागूतात्यांचा तितका चाळीतच नव्हे, मुंबई किंवा संपूर्ण भारतात कोणाचा असेल याबाबत शंका होती. आता पाहा... उडत्या तबकड्यांच्या आजवर ३७१ हकीकती प्रसिद्ध झाल्या असून त्यापैकी २६८ रद्दबातल ठरल्या आहेत, हे नागूतात्या सप्रमाण, ससंदर्भ दाखवू शकत होते. तसेच उरलेल्या २६८-२५१=१७ हकीकती खऱ्याखुऱ्या परकीय जीवसृष्टीकडून आलेल्या अंतराळयानांच्या असून त्या अमेरिकन सरकार बुद्धिपुरस्सर दाबून ठेवत आहे, असा त्यांचा दावा होता. अशा विद्वानाला बाजूला सारून बाबा बर्व्यांना सभेचे अध्यक्षपद मिळावे ही चाळीचीच नव्हे, तर अख्ख्या देशाची शोकान्तिका आहे, असे त्यांनीच अनेकांजवळ बोलून दाखवले होते. ''अरे तात्या, अशा कंप्लेंटस्नी काय सर्व्ह होणार? तू मीटिंगमंदी आपले फॅक्टस् प्रोड्यूस कर, अन् मग पाहू काय आउट्कम होतो ते,'' असे सोकाजींनी चापल्यावर ते त्रस्त समंधासारखे सभेला उपस्थित राहिले.

व्यासपीठावर दोन (चाळीला) अनोळखी व्यक्ती बाबांशेजारी बसल्या होत्या. त्यांची ओळख बाबा करून देतील, अशी चाळकऱ्यांची अपेक्षा होती. पण त्यासाठी त्यांना धीर धरावा लागणार होता.

बाबांनी सुरुवात केली, ''बंधु भगिनींनो, आज आपली चाळ एका ऐतिहासिक टप्प्यातून जात आहे. भारतात आर्य आले, अनार्य आले, यवन-हूण-म्लेंच्छ आक्रमक आले... काही राहिले काही गेले. भारतीय संस्कृती ही अशा परकीय हस्तक्षेपांतून बचावली आहे, उत्क्रांत झाली आहे, सशक्त झाली आहे. आज ती गीतेतल्या कर्मयोगाकडून पाश्चात्यांच्या भोगवादाकडे जात असल्याचे दुर्दैवी घटनाचक्र आपण पाहत आहोत. 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत...' अशी सद्य:स्थिती आहे, अशावेळी आपल्याला धर्माचे अभ्युत्थान करायला वरून मार्गदर्शन पाहिजे...''

''काय म्हणायचं या बाबाला? आता तासभर दळत बसणार...'' अण्णा पावशे जोगदंडांना म्हणाले, पण जोगदंडांची तर केव्हाच ब्रह्मानंदी टाळी लागली होती. पण आपले भविष्य कधी चुकत नाही, हा अण्णांचा दावा ह्यावेळी मात्र चूक ठरला. जांभया, खोकले, टाळ्यांचे वाढते गडगडाट आदींच्या माऱ्यामुळे बाबांनी अर्ध्या तासातच आख्यान आवरते घेतले. ''मित्रांनो, बोलण्यासारखे पुष्कळ आहे. पण आज चाळीची अग्निपरीक्षाच आहे. चाळीला सत्य शोधायचे आहे. सत्यशोधन हे वृत्तपत्रांचे ध्येय! टाइम्सचे डिसोजासाहेब येथे उपस्थित आहेत ते त्याच उद्देशाने. त्यांच्याच पुढाकारामुळे आपल्याला प्राध्यापक कोटीभास्करन् आज मार्गदर्शन करणार आहेत. मी अग्निपरीक्षा म्हटले, अग्निपेक्षा तेजस्वी - कोटी सूर्यांचे तेज घेऊन आलेले हे प्राध्यापक आपल्या परीक्षणाचा निर्णय आज सांगणार आहेत. उडती तबकडी म्हणजे नेमके काय होते? ती कुठून आली, कुठे गेली, याचे गूढ ते आज सोडवणार आहेत. मी त्या दोघा अभ्यागतांचे सहर्ष, सप्रेम स्वागत करतो आणि कोटीभास्करन् साहेबांना विनंती करतो की, त्यांनी ह्या रहस्यावर प्रकाश टाकावा...''

बाबांनी पुढे बोलत राहू नये म्हणून श्रोत्यांनी टाळ्यांचा निर्णायक गडगडाट केला. बाबा खाली बसले आणि प्राध्यापक कोटीभास्करन् उठून उभे राहिले.

प्रा. कोटीभास्करन् यांनी आपल्याबरोबर आणलेली एक छोटीशी पेटी समोरच्या टेबलावर ठेवली. त्यात काय असावे याबद्दल चाळकऱ्यांना उत्सुकता निर्माण झाली. कोटीभास्करन्

यांनी इंग्रजीतून बोलायला सुरवात केली, ''सभ्य स्त्री पुरुषहो, मला मराठी नीट येत नसल्याने मी इंग्रजीतून बोलू इच्छितो...''

असे म्हटल्यावर श्रोत्यांतून आवाज उमटले ''मराठीतून बोला... इथे सगळ्यांना इंग्रजी नीट कळत नाही... स्पीक इन मराठी ओन्ली.''

''साला मराठी स्पीकिंग पॉसिबल होत नाय, तर इन्विटेशन ॲक्सेप्टच का केले? साहेब गेला तरी हे साले मद्रासी त्याचीच लँग्वेज प्रॉपगेट करीत आहेत,'' सोकाजी नागूतात्यांना म्हणाले. नागूतात्यांना मनातून तसेच वाटत असले, तरी कुठल्याही मताला विरोध करायचा त्यांचा बाणा! म्हणून ते उत्तरले, ''आपली मराठी माणसे पुढे येत नाहीत म्हणून हे दाक्षिणात्य मुंबईत मिरवतात! हे आपल्याच लोकांना लांछनास्पद आहे. आणि त्रिलोकेकर, तू तरी मराठीत धड एक वाक्य बोलू शकतोस का?'' हा वाद पुढे सरकला असता, पण शेजाऱ्यांनी त्यातील वाढत्या आवाजाला आवर घातला... ''क्वाएट प्लीज'' ''गप्प बसायला काय घ्याल?'' ''आम्ही तुमचे वक्तव्य ऐकायला नाही आलो'' आदीच्या भडिमारामुळे नागूतात्या आणि सोकाजी यांनी नमते घेतले.

''ओके लेडीज आणि जंटिलमेन! मी माझ्या ब्रोकन मऱ्हाटीत स्पीकिंग करायचा एफर्ट करतो. जरा स्लो असेल, पण तेव्हे तुम्ही कंडोन करा.'' टाळ्यांची दाद देऊन चाळकऱ्यांनी आपला आनंद व्यक्त केला. नाहीतरी त्यांना सोकाजी आणि एच्च. मंगेशराव यांच्या सांग्लमराठीची सवय होतीच. (पण आमच्या वाचकांसाठी आम्ही कोटीभास्करन् यांचे भाषण परिष्कृत करून देत आहोत.) कोटीभास्करन् पुढे म्हणाले...

''उडत्या तबकडीचे काही फोटो माझ्याकडे तपासणीकरता आले तेव्हा माझ्या पहिल्या, वरवरच्या चाचणीत ते उत्तमरित्या पास झाले. फोटो स्पष्ट आहेत. आकाशात अधांतरी असलेल्या ह्या तबकडीवजा यानाच्या गोल खिडक्या त्यांत स्पष्ट दिसतात. ज्या दोन मुलांनी ही छायाचित्रे घेतली त्यांनी यान जवळ येताना, गच्चीत स्थिरावलेले आणि मग ते दूर जाताना पाहिल्याचा दावा केला आहे. मात्र फोटो फक्त दूर जातानाचेच आहेत, कारण यासाठी लागणारा कॅमेरा घेऊन येईपर्यंत यान गच्चीवरून उठलेले होते असे त्यांनी म्हटले आहे. आणि फोटोत जवळ असताना यान मोठे, तर लांब असताना दूरचे दिसत आहे.''

''मी ही चित्रे पाहून चक्रावून गेलो. आजवर उडत्या तबकड्या पाहिल्याचे शेकडो दावे केले गेलेत... (''तीनशे एक्काहत्तर'' नागूतात्या शेजारच्या बाबूकाकांच्या कानात, पण सर्वांना ऐकू जाईल अशा आवाजात, 'पुटपुटले'... सोकाजी आता तोंड फिरवून बसले होते. पुन्हा ''गप्प राहायला काय घ्याल?'', ''आम्ही तुमचे शहाणपण ऐकायला इथे आलो नाही...'' आदी दामदाटीने नागूतात्या शांत झाले. पिकते तिथे विकत नाही ह्या तत्वाचा त्यांचा हा अनुभव नवा नव्हता.) पण छायाचित्रे प्रमाण म्हणून पुढे केल्याचे हे पहिले उदाहरण असावे. छायाचित्रे जे दिसते ते टिपून घेतात, म्हणून इंग्रजीत म्हण आहे की, फोटो कधी खोटे बोलू शकत नाही... म्हणून ही जबानी अधिक विश्वसनीय वाटली. नाहीतर आजवर खोट्या जबान्या देऊन उडत्या तबकड्यांद्वारे प्रसिद्धी मिळवणारे अनेक होऊन गेले. पण शाळकरी मुलगा असे छक्केपंजे करू शकेल असे वाटत नाही.''

इथे अनेकांच्या कौतुकमिश्रित नजरा मधू चौबळकडे वळल्या. ''आपण याला उनाड म्हणत होतो, पण बेट्याने चाळीचे नाव काढले.'' अंबुताई (-नर्सबाई) म्हणाल्या आणि पावशीणबाईंनी मान डोलावली. काशीनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा मात्र कुठे दिसत नव्हता. एकटा मधूच ह्या कौतुकाचा मानकरी ठरणार काय? कोटीभास्करन् साहेब पुढे म्हणाले ''मी प्रिंटची बारीक तपासणी केली, मायक्रोस्कोप वापरला, पण मला त्यांत दोष दिसले नाहीत. कारण फोटो जरी खोटे बोलत नाहीत, तरी फोटो घेणारा बनावट फोटो करू शकतो आणि तसे इथे झाले नाही याची खात्री करून घेणे आवश्यक होते. दुर्दैवाने इतर प्रगतीबरोबर बनावटीचे तंत्रज्ञानदेखील प्रगती करीत आहे.''

असे म्हणून प्राध्यापक महाशयांनी आपली पेटी उघडून त्यातून काही छायाचित्रे आणि त्यांचे निगेटिव्ह काढले आणि डिसोजांकडे सुपूर्द केले. मधू हे सर्व तटस्थपणे पहात होता. त्याच्या चेहऱ्यावर सात्विक समाधान होते. पण काशीनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा कुठे होता?

''हे फोटो आणि निगेटिव्ह आरंभिक चाचणीत पास झाले तरी माझे समाधान झाले नाही.'' कोटीभास्करांनी आपले आख्यान पुन्हा सुरू केले. ''मला सारखी शंका येत होती की, भर दिवसा मुंबईसारख्या गजबलेल्या शहरात असे यान यावे आणि जावे... तेही कोणी अन्य लोकांनी न पाहता... शासकीय रेडारला न दिसता... हे कसे शक्य आहे? आता तुम्ही म्हणाल की, ह्या मुलांना प्रसिद्धी मिळाल्यावर ते यान पाहणारे आणखी लोकही पुढे आले. पण मला त्यात तथ्य वाटले नाही. एकदा एका गोष्टीला प्रसिद्धी मिळाली की तिला दुजोरा देऊन वाहत्या गंगेत हात धुवून घेणारे असे लोक पुढे येतात, हे सर्वविदित आहे. इतकी चमत्कारिक गोष्ट पाहिल्यावर हे महाभाग काही काळ गप्प का राहिले?''

''त्या आक्षेपांनाही उत्तरे आहेत. इतर लोक आपल्याला मूर्खात काढतील म्हणून हे लोक गप्प बसले असतील. तसेच अतिप्रगत जीवसृष्टीला, रेडारला दिसणार नाहीत अशी, अंतराळयाने बनवण्याचे कसब साध्य झाले असेल. शक्य आहे! पण माझे तितके समाधान झाले नाही आणि मी माझा




everest/2000/BCL/72 mr H

शोध चालू ठेवला. आणि अखेर, माझ्या सौभाग्यवतीने उच्चारलेल्या एका वेगळ्याच वाक्यातून मला नवे मार्गदर्शन झाले.''

सर्व गोष्टी योग्य क्रमाने झाल्या पाहिजेत असे ती म्हणाली. आणि मी पुन्हा फोटोंच्या निगेटिव्हज्‌कडे पाहिले. तोपर्यंत मी प्रत्येक निगेटिव्ह स्वतंत्रपणे तपासली होती. आता ते सर्व एकत्र पाहिले. पॉझिटिव्हवर नाही, पण निगेटिव्हवर क्रम असतो. त्यानुसार मी ते पाहिले आणि मला तोपर्यंत न दिसलेली तफावत सापडली...

''जर यान दूर जाताना ते फोटो घेतले असतील तर त्यांच्यात क्रमाक्रमाने यानाचा आकार लहान होताना दिसला पाहिजे. तसे इथे नाही. निगेटिव्ह १ वर यानाचा आकार २ पेक्षा जास्त आहे खरा, पण ३ वर ते आणखी मोठे दिसते, तर ४ वर तेवढाच आकार. पुन्हा ५, ६ वर लहान, तर ७ वर मोठा... जर हे फोटो खऱ्याखुऱ्या दूर जाणाऱ्या यानाचे घेतल्याचा दावा असेल तर तो त्या पाहणीशी विसंगत आहे. ''

कोटीभास्करन् इथे क्षणभर थांबले... त्यांच्या बोलण्याचा श्रोतृवर्गावर परिणाम पाहण्याकरता. विशेषकरून मधूच्या चेहऱ्यावर!

मधूची चुळबूळ त्यांच्या नजरेतून सुटली नाही.

किंचित थांबून त्यांनी आपले वक्तव्य पुढे चालू केले. निगेटिव्ह झेंड्याप्रमाणे फडकावीत ते म्हणाले...

''ह्या निगेटिव्हज् काय दर्शवतात? यान लांब गेले मग जवळ आले. पुन्हा लांब गेले... थोडक्यात त्या दोघांच्या जबानीशी यानाचे फिरणे विसंगत आहे. मग खरे काय मानायचे?

''हे ठरवायला मी मायक्रोडेंसिटॉमीटर हे उपकरण वापरून ह्या निगेटिव्हज् आणि फोटोंची कसून तपासणी केली. ह्या उपकरणाने चित्राचे सूक्ष्म भाग तपासून पाहता येतात. आणि मला काय दिसले? हे अंतराळयान अधांतरी आहे, कारण ते सुताने टांगले आहे.''

ऐकणाऱ्यांत खळबळ उडाली. सुताने यान कसे टांगता येईल? सुताने स्वर्गाला जाण्याचाच हा प्रकार तर नव्हे?

''सुताने यान कसे टांगता येईल?'' लोकांच्या मनातला प्रश्न उच्चारीत कोटीभास्करन् प्रथमच हसले. आणि जादुगाराप्रमाणे त्यांनी आपल्या पेटीतून एक कार्डबोर्ड मॉडेल काढले... त्याला सुतळी बांधली होती.''

''हेच ते यान! पहा फोटोशी पडताळून'', असे म्हणून त्यांनी मॉडेल आणि फोटो डिसोजाकडे दिले. आता मात्र चाळकरी संतापले. काय हा फसवाफसवीचा प्रकार? श्रोत्यांमधल्या गोंगाटाला आवर घालत कोटीभास्करन् म्हणाले:

''मी हा पुरावा कसा मिळवला? पोलिस करतात तसे मी माफीचा साक्षीदार निवडला. मधू चौबळ 'पक्का' आहे, त्याच्या वाटेला न जाता मी काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाला एकटा बोलावून समज दिली. फोटोंची विश्वासार्हता कशी शून्य आहे हे त्याला पटवले. आणि माफीच्या मोबदल्यात वास्तविकता काय ते स्पष्ट करायला सांगितले. ही मूळ कल्पना मधू चौबळच्या सुपीक डोक्यातली आणि त्याला फूस लावली मेंढे पाटलांनी. कारण या घटनेतून आर्थिक फायदा झाला तो त्यांनाच... हे तुम्ही पाहात आहातच. काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने मग सर्व काही कबूल केले आणि त्याने स्वत: बनवलेले मॉडेल माझ्या हवाली केले. इथे माझे काम संपले. आता ह्या अतिचाणाक्ष मुलांचे काय करायचे ते तुम्हा वडील मंडळींनी ठरवायचे. ''

कोटीभास्करन् खाली बसले आणि भाईसाहेब चौबळ उठले. काही न बोलता त्यांनी मधूच्या कानफटीत मारले. बोलण्याचे काम कुशाभाऊंनी स्वत:वर घेतले,''हर हर! काय हा अध:पात! ज्या भरतभूमीत...'' वगैरे वगैरे नाट्यसंवाद त्यांनी सुरू केला. त्यांना थांबवत सोकाजी म्हणाले, ''सरळ समजेल असे बोला ना कुशाभाऊ! साल्याने चाळीचा रेप्युटेशन समदा खलास केला.'' तिकडे द्वारकानाथ गुप्त्यांनी आपल्या मुलीवरच राग काढला: ''कार्टे, पाहून घेईन पुन्हा त्या मवाल्याच्या नादी लागलीस तर!''

''थांबा! थांबा! बंधुभगिनींनो, आपला राग आवरा!'' आवाज चढवत डिसोजा उद्‌गारले. ''मधूचा समाचार आपण नंतर घेऊ. पण जरा आत्मपरीक्षण करा. इथे आपण सगळेच दोषी ठरत नाही का? तुमच्या छापील मुलाखती माझ्याकडे आहेत. हे सर्व तुम्ही का केले? तर प्रसिद्धीच्या मोहापायी. आणि तुम्हाला नादी लावणारे माझ्यासारखे पेपरवाले पण दोषी ठरत नाहीत का? नीट तपासणी केल्याशिवाय सनसनाटी छापणे हा आमच्या पत्रकारितेवरचा डागच आहे. आणि आमच्या ह्या वर्माचा फायदा मधूपासून मेंढे पाटलांपर्यंत तत्वशून्य लोक घेतच असतात.''

डिसोजा बसल्यावर समारोप करायला बाबा बर्वे उभे राहिले. ''डिसोजा योग्य बोलले. ही आत्मपरीक्षणाची, आत्मनियंत्रणाची वेळ आहे. दुनिया फसती है फसानेवाला चाहिये... आपण मोहाला बळी पडलो. अल्पकाळ टिकणाऱ्या प्रसिद्धीच्या मागे धावलो. 'यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम्। ततस्ततो नियम्यैतद् आत्मन्येव वशं न्ययेत्' असे भगवंतांनी गीतेत म्हटले आहे. सैरभैर पळणाऱ्या, धावणाऱ्या मनावर लगाम घालायची गरज आहे. प्रत्येकाने स्वत:ला योग्य ती शिक्षा द्यावी. मी तीन दिवस प्रासंगिक मौन पाळणार. दोन संभाषणांमध्ये बिलकूल बोलणार नाही. माझे मौनव्रत आता ह्या क्षणापासून सुरू झाले असे मी जाहीर करतो.'' चाळीतल्या जनता जनार्दनाला नमस्कार करून बाबांनी आवरते घेतले.

आणि चाळकरी काही काळ आश्चर्याने स्तब्ध होते. बाबांनी इतके छोटे भाषण आजवर केले नव्हते. स्तब्धतेचा फायदा घेऊन एच्च. मंगेशराव (–अथवा यम्म. हट्टंगडी) यांनी 'मनाला आवर घाला' ह्या अर्थी एका भक्तीगीताचे गायन सुरू केले तेव्हा गच्ची आपोआप 'खाली' झाली. चाळ अजून शॉकमध्ये होती.

जिना उतरता उतरता मात्र लोकांना नागूतात्यांचा 'न कोणा एकाला' उद्देशून केलेले भरतवाक्य ऐकू आले ''हा शुद्ध वेडेपणा आहे हे मी आधीच सांगत होतो...''

आणि मग चाळ ताळ्यावर आली.

✠



उडत्या तबकड्यांनी मागे ठेवून दिलेली स्मृती